IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# दलित साहित्यिकांच्या जाणीवा : दलित आत्मकथनांच्या अनुषंगाने

डॉ. शैलजा श्रीधर शिंदे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, सहकारभूषण एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड

**सारांश** : प्रस्तुत संशोधन निबंधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी विचारधारेचा कोल्हापूर जिल्ह्यातील दलित साहित्यिकांच्या आत्मकथनांवर झालेला प्रभाव अभ्यासला आहे. १९६० नंतर दलित साहित्य चळवळीमुळे उपेक्षित समाजाला स्वतःचे अनुभव, वेदना, संघर्ष आणि आत्मभान साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करण्याची संधी मिळाली. तुषार भाग्यवंत यांच्या *कोंडाळ*, नामदेव व्हटकर यांच्या *कथा माझ्या जन्माची* आणि अजित मिणेकर यांच्या *फिरस्तु* या आत्मकथनांच्या आधारे शिक्षण, सामाजिक परिवर्तन, जातीय विषमता, स्वाभिमान आणि आंबेडकरी विचारांचा प्रभाव स्पष्ट केला आहे. या आत्मकथनांतून शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असून दलित समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ते अत्यावश्यक असल्याची जाणीव प्रकर्षाने व्यक्त होते. तसेच आत्मकथन हा साहित्यप्रकार दलित समाजातील आत्मजाणीव, संघर्षशीलता आणि परिवर्तनवादी दृष्टिकोन व्यक्त करणारे महत्त्वाचे माध्यम ठरल्याचे या संशोधनातून अधोरेखित केले आहे.

**मुख्य शब्द :** दलित साहित्य, आत्मकथन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षण

**प्रास्ताविक:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कृतिशील विचारधारेतून १९६० नंतर दलित साहित्याची चळवळ गतिमान झाली. तत्पूर्वी ही साहित्य लेखन होत होते. परंतु, तळागाळातील सामान्य लोकांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी साहित्याची वाट मोकळी झाली ती १९६० नंतरच्या दलित साहित्यामुळेच. साहित्य हा समाज जीवनाचा आरसा आहे.समाज जीवनाला अभिव्यक्त करणारा दस्तऐवज म्हणून साहित्याकडे पाहिले जाते.साहित्य म्हणजे मानवी जीवनातील अनुभव व्यक्त करणारे साधन होय. या संदर्भात जेष्ठ साहित्यिक समीक्षक विचारवंत गंगाधर पांतावणे म्हणतात, 'आंबेडकरी ऊर्जेच्या साहित्य निर्मितीने केवळ मराठी साहित्यातच नव्हे तर एकूणच भारतीय साहित्यात अनेक प्रश्न निर्माण केले गेले मग ते प्रश्न अलक्षी व अव्यक्त अनुभव सृष्टीच्या असतील, भाषाशास्त्र आणि समाजशास्त्राचे असतील, साहित्य आणि समीक्षेचे असतील, दलित साहित्य जातीवादी नव्हते किंवा दलितत्व मिळवणारे नव्हते या साहित्याला मानवतेचे मूल्य होते'. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नवा माणूस आणि नवा परिवर्तन निष्ठ समाज निर्मितीच्या क्रांतीगर्भ प्रेरणा होत्या. दलित साहित्य आत्मशोध असल्याने इतिहासाची चिकित्सा अपरिहार्य होती वर्तमानाची वास्तवता, भविष्याचा वेध या बाबीही अपरिहार्य होत्या. सर्जनशील, वैचारिक, समीक्षात्मक आणि संशोधन


DOI: 10.48175/IJARSCT-37552

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

पर लेखन ही त्याची वागङमय रूपे आज दृष्टीपतात आहेत. महाराष्ट्र आणि संपूर्ण देशात दलित साहित्यिकांनी तयार केलेली बहुविविधता वाङमयकृती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनशील विचार धारेवर आधारित आहे. डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला शिक्षणाचा मूलमंत्र या सबंध साहित्याचा प्रेरणा स्तोत्र आहे. प्रचंड बिकट परिस्थितीवर मात करीत समाजाच्या जाती आणि धर्मांध व्यवस्थेचे ठोकरे खात या साहित्यिकांनी आपले शिक्षण पूर्ण केले आणि शिक्षण घेतल्यानंतरच त्यांना समजले की, ज्ञान म्हणजे व्यक्तीच्या जीवनाचा पाया होय. म्हणून प्रत्येकाने बुद्धीचा विकास करण्यासाठी हाल अपेष्टा सहन करून शिक्षण मिळवले पाहिजे, असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. बुद्धीचा विकास करणे हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. शिक्षणामुळेच तो विकास साधता येतो म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर देशातील शूद्र अति शुद्रांच्या शिक्षणासाठी लढा दिला. कारण, शिक्षणातून सर्वांगीण परिवर्तन होऊ शकते यावर आंबेडकर यांचा ठाम विश्वास होता समाजाचा विकास करायचा असेल तर शिक्षणापेक्षा दुसरे मोठे साधन नाही. कारण शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे यावर त्यांची आढळ श्रद्धा होती. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर समाज घडवण्यासाठी शैक्षणिक क्रांतीची आवश्यकता असल्याची जाणीवही त्यांना होती.

'उपासमारीने शरीराचे पोषण कमी झाल्यास माणूस बलहीन होऊन अल्पयुष्य होतो तसेच शिक्षणाच्या अभावी तो निर्भुत राहिल्याशिवांतपणे दुसऱ्याचा गुलाम होतो', असे गुलामगिरीचे कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे .शिक्षणाच्या अभावाने माणसाच्या आयुष्यात गुलामी प्रवेश करते, म्हणून स्वाभिमानाने व स्वावलंबनाने जीवन जगण्यासाठी शिक्षणाच्या अत्यंत महत्त्व आहे. दलितांच्या जीवनात शिक्षणाचे महत्त्व किती आहे याची जाणीव करून देण्यासाठी डॉ.आंबेडकर म्हणतात,' शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे त्याकरिता आम्ही तीव्र संघर्षासाठी तयार आहोत त्यासाठी आम्ही कोणत्याही भौतिक लाभाचा त्याग करू शकतो. या संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या प्रत्येक लाभाचा त्याग करण्याची आमची तयारी आहे. पण कोणत्याही परिस्थितीत उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांच्या महत्तम उपयोगाचा हक्काचा आम्ही त्याग करण्यास तयार नाही' .शिक्षणाचे हे अमूल्य महत्त्व समजलेल्या तरुणांनी कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देत आपले शिक्षण पूर्ण केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांती गर्व विचारधारेतून शिक्षण घेतलेल्या कवी ,लेखक, गायक, कलाकार यांच्या साहित्यातून सामाजिक विषमतेची, अन्यायाची, जातीयतेची विषवली मोडून काढण्यासाठी दलित समाजाने शिक्षण घेतले पाहिजे.त्याशिवाय तरुणोपाय नाही, असे मौलिक सल्ले देऊ लागले. तरी साहित्यिकांने आपापल्या साहित्य प्रकारांमधून समाजाचे प्रबोधन करण्याचे काम केले. सुरुवातीच्या काळात तर सबंध महाराष्ट्रभर आंबेडकर जलसे चालत होते. यातून समाज सुधारणे बरोबर शिक्षणावर ही भर दिला गेला.कथा, कविता ,नाटकांमधून आंबेडकरी विचार घराघरात पोहोचवण्याचे काम केले गेले.दलित साहित्यिकांनी आत्मकथने काव्यकथा नाटके आंबेडकर जलसे यांनी मोठ्या प्रमाणावर समाज प्रबोधनाचे पर्यायाने शिक्षणाचे काम केले आहे. शिक्षणाच्या दिशेने जाणारा दलित समाज हा त्यांच्या आत्मकथनाद्वारे अधिक प्रभावीपणे व्यक्त झालेला आहे. यासाठी या ठिकाणी आत्मकथन या प्रकाराचा प्रस्तुत निबंधात विस्ताराने विचार केलेला आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

**संशोधनाचा हेतू :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिगर्भ विचारधारेतून व कृतिशील संघर्षातून मागासवर्गीय समाजाच्या सर्वच घटकांच्या वरती प्रभाव पडला. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील दलित साहित्यिकांनी लिहिलेल्या आत्मकथनावरती मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे १९६० नंतर जी पहिली पिढी शिक्षित झाली,तिने समाजाच्या सर्व प्रश्नांच्या वरती चर्चा करायला सुरुवात केली. यातून साहित्य निर्मिती झाली.कोल्हापूर जिल्ह्यातील साहित्यिकांना आपल्या आत्मकथनांमधून आंबेडकर विचारधारा समाजाला सांगण्याचे काम त्यांच्या पश्चात केले आहे. त्यांचे योगदान नेमके किती आहे? व कोणते आहे? हे तपासणे हा या संशोधनाचा हेतू आहे.

प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्रकाशित साहित्य दुय्यम प्रकाशित साधने व आत्मकथनकारांची आत्मकथने आधार म्हणून घेण्यात आली आहेत.

**दलित साहित्यिकांची आत्मकथने:**

**१. कोंडाळ: तुषार भाग्यवंत**

कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील सातवणे या गावी तुषार भाग्यवंत यांचा जन्म झाला. तुषार भाग्यवंत साहित्य जगतात ओळखले जातात ते त्यांच्या गाजलेल्या 'कोंडाळ'आत्मकथनामुळे. आपल्या जीवनाची व्यथा ज्या सातवणे गावात अनुभवली, ती वेदना त्यांनी 'कोंडाळ'मधून व्यक्त केली. आत्मचरित्र लिहिण्याची प्रेरणा त्यांना 'शंकरराव खरात' यांच्या 'तराळ अंतराळ' मधून मिळाली केसरीमध्ये 'तराळ अंतराळाचा' लेख वाचला आणि माझ्या आठवणी मला गप्प बसू देईनात"१. या त्यांच्या आत्मकथनाबद्दल ते म्हणतात, "जे जगत आलो आहे, अनुभवले आहे, मूकपणाने सहन केले आहे तेच इथे लिहिलं आहे ,कोणाबद्दल राग नाही, चीड नाही, द्वेष नाही अथवा गैरसमज नाही,पिढ्यानंपिढ्या कोंडाळ करून जगणाऱ्या माणसांची ही जीवनगाथा आहे, मी उद्याचं स्वप्न पाहतोय कोंडाळ्यातील तरुण पिढी कोंडाळ फोडून बाहेर येईल का?"२

या आत्मकथनात तत्कालीन दलितांच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनाचे दर्शन घडते. तुषार भाग्यवंतांच्या सातवणे गावांमधील दलितांमध्ये कोणीही शिकलेले नव्हते. लेखकाला ही शाळा ही काय भानगड आहे माहित नव्हते. यावरून, एकंदरीत ग्रामीण भागातील दलितांमध्ये शिक्षणाचा अभावच जाणवतो. आपण शिक्षण का घ्यायचं याबद्दल भाग्यवंत म्हणतात,"बाबांच्या पिढ्यान पिढ्यांच्या वंशावळीत मी एकटाच शिकत होतो,का शिकावं? कशासाठी शिकावं? मला कळत नव्हतं, इतर पोरं शिकतात आपणही शिकायचं."३ शिक्षण घेण्यासाठी भाग्यवंत खूप धडपडतो. पण आई वारंवार विरोध करीत असते, तरीही शिक्षण पूर्ण केलं. कधी उपाशीपोटी तर, कधी अर्धपोटी राहून ,पडेल ते काम करीत ,कधी बाजा वाजवून, गवत कापून, एक रुपयासाठी व पोटभर अन्नासाठी कंबर मोडून उकिरड्यावर बसून गुडघ्यात मान घालून काम करावे लागले .मात्र, तुषार भाग्यवंतांच्या पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श होता ते म्हणतात ,प्रथम शिका, इतरांना शिकवा. आज काय पाहतोय, शिक्षणाशिवाय माझा समाज गलित गात्र झाला आहे.दलित समाजाला माणुसकी

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

यायची असेल तर त्यांनी नोकरीसाठी शिकणार ही वृत्ती सोडून दिली पाहिजे. नोकरीसाठी आवश्यक पात्रता जरूर हवी, पण फक्त नोकरी हेच ध्येय न ठेवता सामाजिक संस्कार, क्षमता वाढवण्यासाठी शिकायला हवं. म्हणून भाग्यवंत म्हणतात, "शिक्षणाने वंचित झालेला स्वतःच कोंढाळ करून पडलेल्या समाजाला जागेल तो खरा सुदीन"४ शिक्षणाचे महत्त्व ओळखून त्यांनी स्वतःचा शैक्षणिक विकास केला. एम. ए. बी. एड. पर्यंत शिकले आणि कुटुंबातील प्रत्येकाला शिकवले.दलित समाजाने शिक्षण घेतल्याशिवाय पर्याय नाही हेही ते सांगतात. आज उपेक्षित समाजाचे दुखणे एकच आहे ते म्हणजे अज्ञान. शिक्षण माणसाला डोळस बनवतं, स्वतःचा मार्ग शोधण्यासाठी दिशा दाखवतो. तुषार भाग्यवंतांच्या शिक्षणाबाबतच्या या विचारामुळे दलित चळवळीतील अनेकांना शिक्षणाबाबतची दिशा मिळाली. शिक्षणाने सर्व काही घडते यावर सर्वांचा विश्वास बसला.एकंदरीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे तुषार भाग्यवंतांना दलित साहित्य लिहिण्याची प्रेरणा मिळाली आणि ते आत्मकथनाच्या माध्यमातून व्यक्त झाले.या आत्मकथनांमधून त्यांनी दलित समाजाने शिकण्याशिवाय तरणोपाय नाही. त्यांच्या प्रगती शिवाय समाज पुढे जाऊ शकत नाही. हा मौलिक विचार आणि जाणीव त्यांनी आपल्या आत्मकथनांमधून मांडली आहे.

**२. कथा माझ्या जन्माची : नामदेव हटकर**

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील माले मसुद्या छोट्याशा खेड्यात २४ ऑगस्ट १९२१ रोजी नामदेव घोटकर यांचा जन्म झाला. 'कथा माझ्या जन्माची' या त्यांच्या आत्मकथनामुळे ते प्रसिद्धीच्या झोतात आले. खरे तर, लेखकाने आत्मकथनामध्ये आपल्या जीवनाची कथा सांगितलेली आहे. ढोर समाजामध्ये जन्माला आलेल्या नामदेव घटकांचे हे चरित्र त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाने प्रसिद्ध केले आहे." एक कुशल प्रशासक, नभोवाणीतील एक मोठा अधिकारी, चित्रपट निर्माता, दिग्दर्शक, लोककलेचा दीर्घ अभ्यास, प्रतिभा संपन्न साहित्यिक, प्रगतिशील शेतकरी, जागरूक आमदार आणि तळमळीने सामाजिक कार्य करणारा एक कार्यकर्ता, अशा अनेक विविध अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाला सुरुवातीच्या काळात घरी परिस्थितीला तोंड देताना दिवसातून तीन-तीन नोकऱ्या कराव्या लागल्या."५ ग्रामीण भागातल्या अस्पृश्यतेने होरपळून निघालेल्या आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आदर्श मानव जीवनाची गाडी हाकणाऱ्या नामदेव हटकरांनी कसेबसे शिक्षण पूर्ण केले.पुढे जाऊन कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन यासारख्या वाङ्मय प्रकारावरती त्यांनी पुस्तके लिहिली. समाजकारण, राजकारण यावरील त्यांचे चिंतनही लक्षणीय आहे.

एक साहित्यिक म्हणून यशस्वी झालेले नामदेव हटकर एक उत्तम राजकारणी सुद्धा होते. समाजकारणासाठी राजकारणाचा वापर त्यांनी केला, पण राजकारणातील अस्पृश्यता जाता जात नाही. याची अनेकदा प्रत्यंतरे आल्याचे ते सांगतात. नामदेव हटकर यांनी शून्यातून स्वतःचे विश्व निर्माण केले आणि शिक्षण घेतले. डॉ .आंबेडकरांच्या उपकाराची जाणीव असलेल्या या साहित्यिकांनी आपल्या पदराला खार लावून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाण यात्रेचे चित्रण केले. त्यासाठी त्यांना स्वतःचा छापखाना विकावा लागला.पुढे १९६९ मध्ये 'महापुरुष डॉ. आंबेडकर' हा हिंदी व इंग्रजी भाषेतून लघु चित्रपट काढण्याची संधी त्यांना मिळाली. तेव्हा त्यांना कृत्य- कृत्य वाटले.पण इतके करणाऱ्या

नामदेव व्हटकर यांना महार समाजाने स्वीकारले नसल्याची खंतही त्यांनी आपल्या आत्मकथनांमध्ये मांडली आहे.शिक्षण घेण्यामुळे किंवा शिक्षणाचे महत्त्व काय असते हे समजल्यामुळे त्यांनी आपले सर्व कुटुंब सुशिक्षित केले. मुलांना उच्चविद्याविभूषित केले. त्यांनी महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याला मागासवर्गीयासाठी ज्यादा बजेट करायला लावले. चर्मउद्योग महामंडळ स्थापन केले .महाराष्ट्रभर दौरे करून थोडी तरी जाती भावना दूर करण्याचा प्रयत्न केला. पण, स्वातंत्र्य येऊन इतके वर्ष होऊनही जातीयता जातीभावना अस्पृश्यता गेली नाही याबद्दल त्यांना मनस्वी दुःख झाल्याचे ते वारंवार बोलतात. त्यांच्या अष्टपैलू कार्यकर्तृत्वामुळे दलित समाजातील तरुण विद्यार्थी शिक्षणाकडे झेपावताना दिसतो आहे. शैक्षणिक चळवळ गतिमान करण्यासाठी नामदेव व्हटकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

### ३. फिरस्तु : अजित मिणेकर

चोवीस तास दारूच्या वासात घुटमळणाऱ्या कंजर भट समाजात दारू पिणाऱ्या आणि दारू घालणाऱ्या आई-वडिलांच्या पोटी पाच जून १९५१ रोजी भटकंतीत सांगली जिल्ह्यातील हरिपूर येथे अजित मिणेकर यांचा जन्म झाला. 'फिरस्तु 'हे त्यांचे आत्मकथन भटक्या समाजाच्या आणि एकूणच परिघावर जगत असणाऱ्या दलितांना जगण्याची नवी ऊर्जा निर्माण करणारे आहे.सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्याच्या परिसरातच भटकंतीचे जेवण जगत आज इचलकरंजी येथे स्थायिक झालेले मिणेकर परिस्थिती "माणसाला किती असाह्य बनवते हे बघत आणि भोगत मी जगत होतो असे ते लिहितात"६ कंजारभाट समाजाला ब्रिटिशांनी गुन्हेगार ठरवले होते. 'उपराकार' लक्ष्मण माने यांच्या आत्मकथनाने अजित मिणेकर या भटक्या समाजातील तरुणावरती मोठा प्रभाव पडला आणि त्यांनी आपलं जगणं, भोगणं व्यथा, वेदना आत्मकथनात्मक रूपाने मांडल्या.

फक्त तिसरी येथे इयत्तेपर्यंत शिक्षण घेतलेली झालेल्या अजित मिनीकरांनी भटक्या विमुकतांच्या चळवळीत स्वतःला झोपून दिले दिवसाची दिनचर्या दारूपासून सुरू होत असलेल्या महिने करणे परिवर्तनवादी विचारधारेच्या चळवळीत जायला सुरुवात केली. आचार्य शांताराम गरुड यांची समाजवादी प्रबोधिनीच्या विचारांची छाप त्यांच्यावर पडू लागले यातच महाराष्ट्रात नामांतराच्या चळवळीने जोर धरला मराठवाडा विद्यापीठात ला डॉक्टरांना बाबासाहेब आंबेडकरांचे नाव द्यावे या मागणीसाठी सगळीकडे मोर्चे आंदोलने निघत होती या आंदोलनात अजित मी मेकर सामील होत असेल याशिवाय भटक्या विमुक्त ह्यांच्या राज्यस्तरीय मेळाव्यामध्येही ते हजेरी लावत असतात.

घरामध्ये दारू अंधश्रद्धा तर होतीस परंतु पारंपरिक वळणाने जाणाऱ्या प्रवाहामध्ये बदल करायचा असेल तर फुले शाहू आंबेडकर यांच्या विचाराशिवाय पर्याय नाही हा विचार मनात खोलवर रुजत होता मात्र आज दलित भटक्यांना शिक्षणासाठी प्रवेश मिळणे परिस्थितीने कसे अशक्य आहे हे मी मेकर आपल्या आत्मकथना सांगतात झोपडपट्टीत दारू वाढण्यासारखे व्यवसाय त्याहीपेक्षा घाणेरडे व्यवसाय आणि पिढ्यानपिढ्या हजारो वर्ष शिक्षणाशी संबंध नसलेल्या समाजात त शिक्षणाची जाणीव निर्माण झाली आहे आज या समाजातील तरुण प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत आहेत पुढे येण्याची आणि जीवनच बदलून टाकण्याची धडपड करीत आहेत अजित मेकर यांच्या फिरोस्तूचे सामर्थ्य हे या दृष्टीने

मोठे आहे.७ कंजर पहाट समाज शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात अजूनही कदाचित थोडा वेळ लागेल पण मी मेकर यांच्या प्रयत्नामुळे समाजकार्यामुळे समाजकारणामुळे लक्ष्मण माने यांच्या प्रेरणेमुळे आणि फुले, शाहू आंबेडकरांच्या विचारधारेमुळे तो समाज थोडा तरी शिक्षणात चंचू प्रवेश करीत आहे.

थोडक्यात, अजित मिणेकर यांच्या 'फिरस्तु' या आत्मकथनांमधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणाचा प्रभाव दारू घालणाऱ्या समाजावरही झालेला आहे.या समाजातील शिक्षण घेतलेला हा तरुण आपल्या समाजातील तरुणांना डॉ.आंबेडकरांचा शिक्षणाचा मूलमंत्र देत आहे. एकूणच ,दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत म्हणून ही आत्मकथने दलित समाजाला उभारी देणारी ठरली आहेत. त्यांच्या प्रगती मधील एक परिणामकारक कारण ठरली आहेत.

याशिवाय अलीकडच्या काळामध्ये अशोक जाधव यांचे गोसावी समाजातून जगत असलेले जीवन दर्शन त्यांनी आपल्या 'भंगार'या आत्मकथनांमधून व्यक्त केले आहे. भंगार वेचता वेचता शिक्षणाची पाटी हातात घेऊन उच्च विद्याविभूषित होऊन समाजामध्ये नावलौकिक मिळवणारे अशोक जाधव आणि अहिल्या ही वैद्यकीय शिक्षणासाठी घटस्फोट देणारी कन्या गोसावी समाजातून आलेली दिसते. हा सर्व बदल एकविसाव्या शतकातही फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाला मिळालेला न्याय व बळ देणारा असला तरी आजही उपेक्षतांचा शिक्षणासाठीचा संघर्ष संपलेला नाही आणि दलितांना आलेली जाणीव त्यांच्या आत्मकथनांमधून व्यक्त झाली आहे.

**निष्कर्ष :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून दलित भटका विमुक्त समाज हा शिक्षणाकडे वळला.

२. १९६० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेतून प्रवृत्त झालेला समाज शिक्षणकडे तसेच साहित्याकडे वळला आणि आपले जगणे तो आपल्या भाषेत मांडू लागला.

३. जागा झालेला दलित वर्ग साहित्याबरोबर समाजकारण व राजकारण ही करू लागला.

४. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून साहित्यिक पुढील पिढीला सुसंस्कृत व प्रबोधनात्मक विचारधारा साहित्याच्या माध्यमातून देऊ लागला.

५. डॉ.आंबेडकरांच्या विचारधारेमुळे केवळ पुरुषच नाही तर स्त्रिया ही साहित्य लेखनातून शिक्षणात आज मागे राहिलेल्या नाहीत. एकूणच दलित साहित्यातून आलेल्या आत्मजाणिवा, आत्मभान याचं प्रत्यंतरआपल्याला लेखकांच्या आत्मकथनांमधून जाणवते.

**संदर्भ :**

१. भाग्यवंत तुषार: कोंडाळ, अजब पुस्तकालय, कोल्हापूर,१९८६,पृ.२

२.कित्ता,पृ.२

३.कित्ता.पृ.२५

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

४.कित्ता.पृ.१०३

५.व्हटकर नामदेव,कथा माझ्या जन्माची,अजब पुस्तकालय, कोल्हापूर,२०१०

६.गायकवाड संपत, (डॉ.)दलित आत्मकथने भाषिक समाज:भाषा आणि भाषाव्यवहार, प्रज्ञा प्रबोध प्रकाशन, सांगली,२०१२,पृ.१२९

७.मिणेकर अजित,फिरस्तु, सलोनी प्रकाशन, इचलकरंजी,१९९७.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/IJARSCT-37552